**इमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३५/२०१८-१९/ २१९ दिनांक: २६.०९.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ३५(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | श्री भिमा लक्ष्मण पाटील तर्फे किरण रा. पाटील<br>मु.पो. शिपूर तर्फे नेसरी ता. गडहिंग्लज<br>जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय गडहिंग्लज | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग नेसरी | |

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.बी. बारसिंग, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

26/9/2018

प्रस्तुतची तक्रार आज रोजी सुनावणी करिता घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारातर्फे त्याचे नातु किरण रामचंद्र पाटील हे हजर होते तसेच वि. प. कंपनीतर्फे श्री संदिप दंडवते, उपकार्यकारी अभियंता उपविभाग नेसरी विभागीय कार्यालय गडहिंग्लज हे हजर होते.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन करता असे निदर्शनास आले की, तक्रारदाराने या प्रकरणात केलेली विनंती अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आधीच मान्य केली आहे. तसेच वि.प. ने या मंचासमोर दाखल केलेल्या लेखी निवेदनावरुन असे निदर्शनास येते की, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाचे पालन करण्याच्या हालचाली प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत तक्रारदाराच्या प्रस्तुतच्या तक्रारीत देखील जी मागणी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने आधीच मंजूर केली आहे, त्या मागणीचा पुर्नउच्चार करण्यात आलेला आहे. तक्रारदाराने मुळ प्रकरणात केलेल्या मागणी पेक्षा इतर दोन जादा मागण्या म्हणजे मुळ ग्राहकाचे नावाचे ठिकाणी तक्रारदाराचे नाव नोदवण्यात यावे आणि वाढिव वीज भार मंजूर करावा, या जादाच्या मागण्या केलेल्या आहेत. या दोन्ही स्वतंत्र बाबी असून त्या मागण्यांकरिता तक्रारदाराला वेगवेगळे अर्ज करावे लागणार आहे. त्या मागण्या या तक्रार अर्जाच्या भाग होऊ शकत नाहीत. तक्रारदाराची मुळ मागणी कक्षाने यापूर्वीच मंजूर केली असल्याने व त्या आदेशाच्या अंमलबजावणी प्राप्त अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने सुरु केली असल्याने प्रस्तुत प्रकरण या मंचापुढे चालण्यास पात्र नाही असे या मंचाचे मत आहे.

सबब प्रस्तुतची तक्रार खारीत करावी लागेल असे या मंचाचा निष्कर्ष आहे.

तथापि सुनावणी दरम्यान तक्रार व वि.प. कंपनीच्या मध्ये समझोता होऊन त्या योगे वरीष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला विज बिल दुरुस्तीचा प्रस्तावाला अंतिम मंजूरी मिळेपर्यन्त पुढील आदेश मिळेपर्यन्त विज बिल माहे जून २०१८ पासून चालू मिटर रिडींग प्रमाणे त्यातील मागील थकबाकी व्याज वगळता रक्कम भरण्यात अर्जदार तयार असल्याचे उभय पक्षानी मान्य केलेले आहे. सदरचा समझोता या प्रकरणी दाखल केले आहे.

सबब वरील प्रकरण निर्गमित करण्यात येत आहे आणि खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

21/9/18 | | 26/9/2018
---|---|---
( पी.एस. पुजारी) | (एन. बी. बारसिंग) | (ए.व्ही. देशपांडे)
ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष